# स्वराज्यजननी वीरमाता जिजाऊ



वीरमाता जिजाऊ या छत्रपती शिवाजी महाराजांच्या मातोश्री व शहाजीराजे भोसले यांच्या पत्नी. महाराष्ट्राच्या इतिहासातील त्यांचे स्थान अनन्यसाधारण आहे; कारण त्या केवळ स्वराज्यसंस्थापक शिवाजी महाराजांच्या माता नव्हत्या, तर दीनदुबळ्यांच्या, रयतेच्या मातोश्री होत्या. जिजाऊंचा जन्म 12 जानेवारी 1598 रोजी सिंदखेडराजा येथे झाला. त्यांचे वडील लखुजीराव जाधव हे पराक्रमी सरदार होते. जिजाऊंच्या जन्मानंतर त्यांनी हत्तीवरून साखर वाटली. आजच्या काळात मुलगी जन्माला आल्यावर नाराज होणाऱ्या लोकांना लखुजीराव दाखवून देतात की मुलगी जन्माला आल्यानंतर आनंद कसा साजरा करायचा. ज्या वयात मुले खेळात रमलेली असतात, त्या वयात जिजाऊ तलवार हातात घेऊन युद्धकौशल्याचे धडे घेत होत्या. जाधव आणि भोसले या दोन बलाढ्य घराण्यांचा लष्करी आणि राजकीय वारसा त्यांच्या व्यक्तिमत्त्वात एकत्र आला होता.

## स्वराज्याची संकल्पना

बालपणापासूनच जिजाऊंनी रयतेवर होणारा अन्याय, जुलूम आणि वेगवेगळ्या सत्तांचा अत्याचार जवळून पाहिला. या अनुभवातूनच शहाजी राजे आणि त्यांच्या मनात स्वराज्याची संकल्पना रुजली आणि त्यांनी तीच संकल्पना शिवाजी महाराजांच्या मनात पेरली. जिजाऊ शिवरायांच्या पहिल्या गुरू होत्या. त्यांनी शिवरायांना ज्ञान, चारित्र्य, न्याय, मुत्सद्देगिरी, शस्त्रविद्या, राज्यकारभार आणि माणुसकी यांचे बाळकडू दिले. यश मिळवण्यासाठी हाती तलवार घ्यावी लागते, चातुर्य पणाला लावावे लागते, प्रयत्नांची पराकाष्टा करावी लागते यावर जिजाऊंचा दृढ विश्वास होता. जिजाऊ प्रयत्नवादी होत्या.

## रयतेची कणव, न्यायप्रिय आणि कुशल प्रशासक

पुण्याला आल्यावर सुरुवातीला जिजाऊंनी शिवरायांच्या नावाने स्वतः राज्यकारभार पाहिला. शिवराय स्वराज्याबाहेर असताना किंवा संकटात असताना अत्यंत समर्थपणे स्वराज्याचा कारभार सांभाळला.

न्यायदानाच्या बाबतीत त्या अत्यंत कठोर आणि निःपक्षपाती होत्या. सामान्य प्रजेपासून सरदारांपर्यंत सर्वांसाठी न्याय समान असावा, हा त्यांचा ठाम आग्रह होता. त्यांनी शिवरायांनाही नेहमी प्रजेची काळजी घेणे, स्त्रियांचा सन्मान राखणे आणि अन्यायाला थारा न देणे हे संस्कार दिले. एक योद्धा म्हणून छत्रपती शिवाजी महाराज यांना घडवताना त्यांनी ज्येष्ठांचा आदर आणि स्त्रियांचा सन्मान देखील शिकवले. परकी स्त्री ही आई - बहिणीसमान असावी असे त्यांनी कायम त्यांच्या मनात रुजवले. इतकेच नाही तर पशुपक्षी, जनावरं या मुक्या प्राण्यांनाही मान देण्याचे शिकवले.

स्त्री असूनही आणि विधवा असतानाही सदरेवर बसून दरबारात राज्यकारभार व न्यायनिवाडा करण्याची परंपरा राजमाता जिजाऊ यांनी सुरू केली. स्त्री-समानतेच्या चळवळीची पायाभरणी त्यांनीच केली.

## रणरागिनी

जिजाऊ केवळ सल्लागार नव्हत्या, तर त्या धैर्यवान योद्ध्याही होत्या. पन्हाळगडच्या वेढ्याच्या वेळी त्यांनी स्वतः शस्त्रसज्ज होऊन शिवाजी महाराजांच्या सुटकेसाठी सैन्य गोळा करण्याचा निर्धार केला होता. “शिवबावाचून मला सर्व दिशा अरण्यासारख्या आहेत,” असे म्हणत त्यांनी सरदारांनाही त्यांच्या कर्तव्याची आठवण करून दिली. त्यावेळी त्यांचे वय बासष्ट वर्षे होते.

## परिवर्तनवादी विचार करत अंधश्रद्धा झुगारल्या

जिजाऊ 17व्या शतकातील अत्यंत प्रगत विचारांच्या महिला होत्या. पती शहाजीराजांच्या निधनानंतर त्यांनी सतीसारखी अमानवी प्रथा शिवरायांच्या म्हणण्यावरून नाकारली आणि स्वतःला स्वराज्याच्या उभारणीसाठी पूर्णपणे समर्पित केले. त्यांनी पुण्यातून गाढवाचा नांगर फिरवण्याची अंधश्रद्धा झुगारून देऊन पुण्याची उभारणी केली. राजाराम महाराज पालथे जन्माला आल्यावर कुठलाही अपशकून मानला नाही.

## लोककल्याण आणि मातृत्व

जिजाऊ रयतेची आपल्या मुलांप्रमाणे काळजी घेत. स्वराज्यातील विठोजी हैबतरावाची आर्थिक परिस्थिती बेताची होती. विठोजीच्या मुलीचे लग्न ठरले होते. ही बाब जिजाऊंना समजताच त्यांनी विठोजीच्या मुलीच्या लग्न खर्चासाठी 25 होन दिले. तसेच पाचशे लोकांच्या जेवणाचे सामान विठोजी हैबतरावाकडे पाठवून दिले. सईबाईंच्या निधनानंतर संभाजीराजांचे संगोपनही त्यांनी अत्यंत मायेने आणि जबाबदारीने केले. रयतेच्या स्वराज्याचे दोन छत्रपती घडवणारी राजमाता - छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज. जिजाऊंचे मातृत्व केवळ कुटुंबापुरते मर्यादित न राहता संपूर्ण स्वराज्यासाठी विस्तारले होते.



## जिजाऊ आणि शिवराय

त्यांच्या मार्गदर्शनामुळेच शिवाजी महाराजांसारखा आदर्श राजे घडले आणि एक नवी, न्यायाधिष्ठित समाजरचना उभी राहिली. जिजाऊंचे कार्य म्हणजे स्वराज्याचा भक्कम पाया होय. जसा पाया स्वतः जमिनीत गाडून घेऊन संपूर्ण इमारतीचा भार पेलतो, तसेच जिजाऊंनी स्वतः झिजून हिंदवी स्वराज्याची गगनचुंबी इमारत उभी केली. जिजाऊ आणि शिवराय यांचे नाते म्हणजे ‘मूळ’ आणि ‘वृक्षा’सारखे होते; जिजाऊंनी आपल्या विचारांनी आणि कष्टांनी स्वराज्याची मुळे घट्ट केली, म्हणून शिवरायांचे हे स्वराज्य एका महावृक्षाप्रमाणे सर्व जाती-धर्माच्या रयतेला सावली देऊ शकले. जिजाऊंनी स्वराज्याचे स्वप्न पाहिले, शिवरायांनी ते वास्तवात आणले.

## आधुनिक भारताचा आधार: भारतीय संविधान

जिजाऊ-शिवरायांची मूल्ये आज आपल्या संविधानाचा आधार आहेत. छत्रपती शिवरायांचे मानवतावादी आणि समतेचे विचार महात्मा फुले आणि राजर्षी शाहू महाराजांनी पुढे नेले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी याच विचारांना भारतीय संविधानात स्थान दिले. बंधु-भगिनींनो, आपण आपल्या कृतीमधून जिजाऊंना अभिवादन करूया. समाजामध्ये स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय या भारतीय संविधानाच्या मूल्यांचा, म्हणजेच जिजाऊंच्या आणि शिवरायांच्या विचारांचा प्रसार करूया!




*स्वराज्याचा जिने घडवला विधाता, धन्य ती स्वराज्यजननी जिजामाता!*

## संविधान जागर अभियान

**संविधान जागर अभियान निमंत्रक समिती:** मा.न्या.बी.जी. कोळसे पाटील, मा.न्या.ए.एम. ठिपसे, मा.न्या. टी.व्ही. नलावडे, तुषार गांधी, डॉ. राम पुनियानी, डॉ. नितीन राऊत, धनाजी गुरव, नीरज जैन

स्वप्निल फुसे: 79723 45764 | नागार्जुन वाडेकर: 98602 39899 | राजाभाऊ करवाडे: 98222 02739

**samvidhan.jagar** **samvidhanjagar.org**